# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

५०-५३ जा.क्र.आस्था/मळगांव/विका/क८८/चौकशी/आदेश

सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, नांदगांव
यांचे कार्यालय तालुका- नांदगांव जि नाशिक
दिनांक :-४/२/२०१७

वाचावे :-१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद
२. श्री. एम.डी. पाटील, लेखापरिक्षक सहकारी संस्था नांदगांव यांचेकडील लेखापरिक्षण अहवाल जा.क्र.लेप/अह./२०१०-२०१२/२०९/सन २०१६ दि.२५/११/२०१६रोजीचा विनिर्दीष्ठ अहवाल
३.श्री. एम.डी. पाटील, लेखापरिक्षक, सहकारी संस्था नांदगांव ता.नांदगांव जि. नाशिक यांचेकडील दिनांक २५/११/२०१६ प्रशासकीय वनिर्दीष्ठ अहवाल
४. विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडील विनिर्दीष्ठ प्रशासकीय/ अफरातफर विशेष अहवाल जा.क्र.लेप/अफ-प्रशा/अ.ह./मळगांव वि.का/सन २०१०-११ ते २०११-१२/२/सन २०१७ दिनांक २/१/२०१७

ASSISTANT REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES NANDGAON, DIST. NASIK

ज्याअर्थी मळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मळगांव ता. नांदगांव जिल्हा नाशिक या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये या कार्यालयाकडे नोंदणी झालेली आहे.

ज्याअर्थी उपरोक्त संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेने स्विकारलेल्या व या कार्यालयाने मंजुर केलेल्या उपविधीतीरल तरतुदी अन्वये करणे संस्थेस व संस्थेच्या संचालकाना बंधनकारक आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक २ अन्वये श्री. एम. डी. पाटील , तालुका लेखापरीक्षक, सहकारी संस्था नांदगांव यांनी मळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मळगांव ता.नांदगांव जि. नाशिक या संस्थेचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या कालावधीचा फेरलेखापरीक्षण अहवाल या कार्यालयास सादर करुन लेखापरिक्षणच्या वेळी निदर्शनास आलेल्या अफहाराबाबतचा विनिर्दीष्ठ अहवाल पुढील कायदेशी कार्यवाहीस्तव सादर केला आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक ३ अन्वये श्री. एम.डी. पाटील, तालुका लेखापरिक्षक, सहकारी संस्था नांदगांव ता. नांदगांव जि. नाशिक यांनी मळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मळगांव ता. नांदगांव जि. नाशिक या संस्थेच्या सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या कालवधीचे लेखापरिक्षण करुन प्रशासकीय विनिर्दीष्ठ अहवाल पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव या कार्यालयास सादर केला आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक ४ अन्वये मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था नाशिक यांचेकडील दिनांक २/१/२०१७ रोजीचे पत्रान्वये वरील वाचावे क्रमांक २ , व ३ अन्वये सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करणेबाबत सुचित केलेले आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८८ अन्वये एखादया संस्थेची लेखापिरक्षण निरिक्षणच्या प्रारंभाच्या तारखेपुर्वी संस्थेच्या कोणत्याही पैशाचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले आहे. किंवा त्यांने असा पैशा किंवा मालमत्ता ठेवून घेतली आहे. किंवा त्याच्या संबंधात तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे. किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्या बदल तो दोषी झाला आहे. याबाबत निबंधकाचे खात्री होईल तर निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्ती विरुध्द अरोप ठेवला येईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

..२..

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, वाचावे क्रमांक २, व ३ अन्वये या कार्यालयास सादर झालेल्या अनुक्रमे विनिर्दीष्ठ व प्रशासकीय विनिर्दीष्ट अहवाल पहाता अपहार व गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आल्याने सदरच्या विनिर्दीष्ट व प्रशासकीय विनिर्दीष्ट अहवालातील गंभीर मुद्दांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करुन त्यांच्यावर उपरोक्त अफहारातील / गैरव्यवहारातील जबाबदारी निश्चित करुन ती त्यांचेकडून वसुल करणे क्रमप्राप्त असल्याची माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

-: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी एस.पी. कांदळकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव ता. नांदगांव जि. नाशिक असा आदेश देतो की, मळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मळगांव ता. नांदगांव जि. नाशिक या संस्थेचे श्री. एम.डी. पाटील, लेखापरिक्षक, सहकारी संस्था, नांदगांव ता. नांदगांव जि. नाशिक यांनी सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या कालाववधीच्या केलेल्या लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने सादर केलेल्या विनिर्दीष्ठ व प्रशासकीय विनिर्दीष्ठ अहवालातील सोबत जोडलेल्या परिशिष्ठ अ व परिशिष्ठ ब मधील मुद्यांची चौकशी करणेकामी श्री. एस.पी. कांदळकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये सखोल चौकशी करुन व संबंधीतावर योग्य ती जबाबदारीची रक्कम निश्चित करुन चौकशी अहवाल आवश्यकत्या कागदपत्रांसह या कार्यालयास सादर करावा. सदर चौकशी कामी चौकशी अधिकारी यांना चौकशी फी म्हणून रक्कम रुपये १५,०००/- मंजुर करण्यात येत असून त्याची जबाबदारी संबंधीतावर निश्चित करावी. चौकशी अधिकारी यांनी या आदेशाच्या तारखे पासून सहा महिन्यात सदरची चौकशी पुर्ण करावी. व चौकशी अहवाल स्वंयस्पष्ट अभिप्रायासह / निश्चित केलेल्या जबाबदारीसह दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक ४/ ०२/२०१७ रोजी माझ्या सही शिक्यानिशी पारित केला असे.

स्थळ :- नांदगांव
दिनांक :-४/०२/२०१७

ASSISTANT REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES NANDGAON, DIST. NASIK

( एस. पी. कांदळकर )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नांदगांव जि.नाशिक

प्रति,

१.श्री. एस.पी.कांदळकर, सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, नांदगांव ता.नांदगाव जि. नाशिक

२/- त्यांना कळविण्यांत येते की, आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" व "ब" मधील मुद्दयाची मुद्देनिहाय चौकशी करुन व जाबबदारी निश्चित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह/ पुराव्यासह अहवाल या कार्यालयास मुदतीत सादर करावा.

२) चेअरमन/सचिव,
मळगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.मळगांव ता. नांदगांव जि. नाशिक

२/- आपणास आदेशीत करण्यांत येते की, चौकशीकामी चौकशी अधिकारी यांना योग्य ते सहकार्य करावे व यात कसुर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

<u>प्रत माहितीस्त सविनय सादर.</u>

१. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक.
२. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
३. मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, नाशिक.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नांदगांव जि.नाशिक

Scanned by CamScanner